रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक १

www.ramprahar.com

# राम प्रहर

शुक्रवार १८ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २












# खाऱ्या पाण्यामुळे होणारे शेतीचे नुकसान टाळण्यासाठी ठोस निर्णय घेणार -मंत्री गोगावले

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शहापूर परिसरातील खारभूमीमध्ये शेती व मच्छीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणींवर राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत असून, सर्व संबंधित खात्यांची संयुक्त बैठक घेऊन ठोस निर्णय घेतला जाईल, अशी माहिती खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांनी विधान परिषदेत गुरुवारी (दि. १७) दिली.

सदस्य प्रवीण दरेकर यांनी अर्धा तास चर्चेदरम्यान रायगड जिल्ह्यातील शहापूर येथील समस्येविषयी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना मंत्री गोगावले बोलत होते.

मोठा पाडा (शहापूर) योजनेचे एकूण क्षेत्र - ४२३ हेक्टर असल्याचे सांगून मंत्री गोगावले म्हणाले की, त्यापैकी ३८७.५१ हेक्टर जमीन एमआयडीसीने संपादित केलेली आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून एमआयडीसीने या भागात जागा संपादित केली असून, त्याचा थेट परिणाम स्थानिक शेतकऱ्यांच्या शेती आणि उपजीविकेवर झाला आहे. खाड्यांमधून खारं पाणी शेतीमध्ये घुसल्याने भातशेतीसह मच्छीपालनही बाधित झाले आहे. ही समस्या केवळ शहापूरपुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण रायगड जिल्ह्यातील खाडी किनाऱ्यावरील गावांमध्ये अशीच परिस्थिती आहे. शेतकरी उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे हा प्रश्न अत्यंत गंभीर असून तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. हा विषय उद्योग, पर्यावरण, महसूल, वन आणि एमआयडीसी या चार विभागांशी संबंधित आहे. लवकरच या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची, स्थानिक आमदारांची, शेतकरी प्रतिनिधींची बैठक घेऊन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ठोस निर्णय घेतला जाईल .मंत्री गोगावले म्हणाले की, खारभूमीतील पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर मंग्रोव्ह (खारफुटी) उगवू लागले असून, त्यामुळे शेती अडचणीत आली आहे. मंग्रोव्ह संरक्षित असल्याने वनखात्याचे निर्बंध लागू होतात आणि शेतकऱ्यांना स्वतःच्या जमिनीवरही शेती करता येत नाही. याविषयीही बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल असे मंत्री गोगावले यांनी सांगितले.

## विविध शाळांमध्ये वह्यांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटपाचा उपक्रम सुरु आहे. बुधवारी चिंध्रण येथील सुधागड एज्युकेशन सोसायटी माध्यमीक विद्यालय आणि रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी भाजप नेते एकनाथ देशेकर, शिवाजी दुर्गे, सरपंच एकनाथ पाटील, रघुनाथ फराड, दिनेश पाडकर, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अंकुश पाटील, लहुशेठ पाटील, संतोष देशेकर, भगवान कडू, बाळाराम पाटील, रोहीदास पाटील, बाबूशेठ मुंबईकर, माजी उसरपंच नरेश सोनावळे, लक्ष्मणशेठ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## दुरशेत येथील पर्यायी रस्त्यासाठी प्रांत कार्यालयात मंगळवारी बैठक

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दुरशेत गावातील पर्यायी रस्त्यासाठी ग्रामस्थानी जलसमाधी आंदोलन केले. या वेळी पर्यायी रस्त्यासाठी येत्या मंगळवारी प्रांत कार्यालयात बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन प्रांत प्रवीण पवार यांनी दिले.

दुरशेत येथील ग्रामस्थांनी अवजड वाहतुकीच्या विरोधात गेल्या महिन्यात रास्ता रोको केला होता. या वेळी तहसीलदारांच्या वतीने पर्यायी रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू होईल, असे सांगितले होते. त्या वेळी दिलेले आश्वासन पूर्ण न झाल्याने गुरुवारी (दि. १७) ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

या वेळी पोलिसांनी हस्तक्षेप करीत आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना नदीत जाण्यापासून मज्जाव केला. प्रांत प्रवीण पवार यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेत येत्या मंगळवारी पर्यायी रस्त्याबाबत बैठक घेऊन मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन उदय गावंड, मिलिंद गावंड व आंदोलकांना दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी आपले आंदोलन स्थगित केले.

या सदंर्भात पत्रकारांशी बोलताना प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी सांगितले की, ग्रामस्थांची जी पर्यायी रस्त्याची मागणी आहे त्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, परंतु गौण खनिज उत्खननाच्य रीतसर परवानग्या असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

## गाडीत लिफ्ट देऊन लुबाडणाऱ्या दुकलीला पोलिसांकडून अटक

**पनवेल : वार्ताहर**

गाडीत लिफ्ट देऊन प्रवाश्याला मारहाण करून लुबाडणाऱ्या दुकलीला पनवेल शहर पोलिसांनी कोकणातून अटक केली आहे.

प्रशांत पाटील या इसमाला आरोपी असदुल्ला उस्मान मिरकर (वय २८ रा. माणगाव), जुबेर मुजावर (वय २५ रा दापोली) यांनी पनवेल बस डेपोच्या बाहेर गाडीत लिफ्ट देण्याच्या बहाण्याने बसवून त्याला नेक्सॉन मॅरेथॉन बिल्डिंग पळस्पे येथे आणून त्याला मारहाण करून त्याच्या कडील ७ हजार रुपये किमंतीचा मोबाईल तसेच त्याच्या गुगल पे वरून ६ हजार १०० रुपये काढून घेतले तसेच त्याच्या कडे असलेली ६०० रुपये रोख रक्कम आणि इतर महत्वाचे कागदपत्र काढून घेऊन त्याला मारहाण आणि धमकी देऊन मुद्देमाल घेऊन ते पसार झाले होते.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण फडतरे, पोहवा अमोल पाटील, पोहवा संदेश म्हात्रे, पोहवा सूर्यकांत कुडावकर, पोना सम्राट डाकी, पोना मिथुन भोसले, पोशी विशाल दुधे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपींचा शोध घेतला असता एक आरोपी चिपळूण परिसरातून तर दुसऱ्या आरोपीला माणगाव परिसातून ताब्यात घेऊन गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## खोपोली-पाली मार्गावर मोटरसायकल घसरली; एक ठार, एक गंभीर जखमी

**खालापूर :** खोपोली-पाली रस्त्यावर उंबरे कारगाव गावाजवळील उतारावर रॉयल एनफिल्ड मोटरसायकल स्लीप झाली. या अपघातात १ ठार, तर १ गंभीर जखमी झाला. आधी दोन्ही जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान, लखिंदर कुमार यादव (५२) बिहार यांना रुग्णालयात दाखल केले असता ते मृत असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. ही व्यक्ती वसंत माने चाळ उंबरे येथील रहिवासी आहे. सद्यस्थितीत जखमीचे नाव समजू शकले नाही. त्याला पुढील उपचारासाठी कळंबोली एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.





























# विधीमंडळ लॉबीतील हाणामारी योग्य नाही –मुख्यमंत्री



**मुंबई** : विधीमंडळाच्या लॉबीत गुरुवारी (दि. १७) आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, घडलेली घटना अतिशय चुकीची आहे. अशा प्रकारची घटना घडणे हे बिलकुल योग्य नाही. हाणामारी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर कारवाई झालीच पाहिजे, असे म्हटले आहे. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सभापती यांच्या अंतर्गत हा सगळा परिसर येतो. त्यामुळे सभापती आणि विधानसभा अध्यक्षांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी. अशा प्रकारे या ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात लोक जमा होतात आणि मारामारी करतात हे या विधानसभेला शोभणारे नाही. त्यामुळे याच्यावर निश्चित कारवाई झालीच पाहिजे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १

www.ramprahar.com

शुक्रवार १८ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


पेण दुरशेत येथील पर्यायी रस्त्यासाठी मंगळवारी बैठक/२

कोट्यवधींच्या फसवणूकप्रकरणी प्रसन्न पुलेकरला अटक/५

विद्यार्थ्यांनी अनुभवली जादूच्या खेळांची मजा/६


# भाजपच्या आक्रमक भूमिकेनंतर पनवेल मनपा क्षेत्रात मालमत्ता करावरील शास्ती माफीची अभय योजना लागू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या आक्रमक भूमिकेनंतर पनवेल महापालिका क्षेत्रातील मालमत्ता करावरील शास्ती माफीची अभय योजना लागू करण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे नागरिकांची ही दीर्घकालीन मागणी अखेर मान्य झाली आहे.





पनवेल महापालिका क्षेत्रातील मालमत्ता करावरील लावलेली शास्ती तातडीने अभय योजना लागू करून रद्द करावी यासाठी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व माजी नगरसेवक गुरुवारी (दि. १७) आक्रमक झाले होते. महापालिका आयुक्तांच्या दालनासमोरच या पदाधिकाऱ्यांनी ठिय्या मांडला. आयुक्तांविरोधात घोषणाबाजी करून जोपर्यंत शास्ती माफीची योजना लागू करत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील, अशी ठाम भूमिका महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी घेतल्यामुळे काही काळ पालिकेत तणावाचे वातावरण होते.

दरम्यान, भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली आणि ५ वाजेपर्यंत सकारात्मक निर्णय घ्या; अन्यथा ठिय्या आंदोलन सुरूच राहील, असा आक्रमक पवित्रा घेतला. आयुक्त मंगेश चितळे यांनी या संदर्भात शास्ती माफीची योजना लागू करू, अशी भूमिका घेतल्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले. या वेळी शास्ती माफीची अभय योजना लागू केल्याबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आमदार प्रशांत ठाकूर व आयुक्त मंगेश चितळे यांचे आभार व्यक्त केले.

भाजपच्या आंदोलनाला आलेल्या तातडीच्या यशानंतर आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन चार टप्यात होणाऱ्या या शास्ती माफीच्या अभय योजनेची माहिती दिली. यामध्ये पहिल्या महिन्यात थकीत कर भरणाऱ्यांना ९० टक्के अशी सर्वाधिक शास्ती माफी मिळणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. पुढील दोन महिन्यांत चार वेगवेगळ्या टप्यात ही शास्ती माफीची अभय योजना लागू केली जाणार आहे. आयुक्तांनी घेतलेल्या या निर्णयामुळे मागील आठ वर्षांपासून पनवेल महापालिकेच्या थकीत १२०० कोटी मालमत्ता कर वसुलीचा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रात तीन लाख ६४ हजार १७४ मालमत्ताधारक आहेत. यापैकी साडेतीन लाखांपेक्षा अधिक मालमत्ताधारकांनी कर भरला नाही. यामध्ये सुमारे १४०० कोटी रुपये मालमत्ता कर आणि तो कर थकविल्याने सुमारे ६०० कोटी रुपयांची शास्ती (दंड) करधारकांना लावण्यात आला होता. याविषयी जून महिन्यात नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के.एच. गोविंदराज यांच्या मुख्य उपस्थितीत मुंबईत झालेल्या बैठकीत करावरील शास्ती माफीचा विषय आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात येत असल्याने त्यांनी याबाबत निर्णय घेण्याची सूचना केली होती. महापालिका आयुक्तांनी याविषयी प्रधान सचिवांच्या बैठकीचे इतिवृत्त व निर्देश प्राप्त झाल्यावर शास्ती माफीची अभय योजना लागू करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आग्रही भूमिका मांडली होती. (पान ५ वर..)

**पनवेल महापालिकेच्या ॲपमधून नागरिकांनी कर जमा केल्यास शास्ती माफीच्या योजनेसोबत दोन टक्के सवलतसुद्धा मिळू शकेल. त्यासाठी नागरिकांनी पनवेल कनेक्ट ॲपच्या माध्यमातून कर जमा करावा. शास्ती माफीची ही अंतिम अभय योजना ही यापुढे राबविली जाणार नाही. यामुळे संबंधित योजनेचा सर्वाधिक करदात्यांनी लाभ घ्यावा. एकरकमी सर्व थकीत कर भरल्यास या योजनेचा लाभ नागरिक घेऊ शकतील तसेच चालू आर्थिक वर्षातील कर देयकाचा भरणा केल्यास चालू कर देयकावर पाच टक्के सूट नागरिकांना मिळू शकेल. –मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका**

## आमदार प्रशांत ठाकूर यांची महत्त्वपूर्ण भूमिका

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी स्पष्ट मागणी केली की, पनवेल महापालिका हद्दीत पालिकेने लावलेला कर आणि त्यावर लावलेली शास्ती हीदेखील जुलमी आहे. पालिका मालमत्ता कर माफ करू शकत नसेल, तर करावर लावलेली शास्ती शंभर टक्के माफ करावी. शास्ती आज माफ न झाल्यास सायंकाळी ५नंतर पालिकेच्या गेटवर बसून आंदोलन करून कोणत्याही कर्मचाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला बाहेर पडू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला होता. आमदारांच्या इशाऱ्यानंतर महापालिकेने अखेर मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत देणारी अभय योजना जाहीर केली.

## नाशिकमध्ये भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू; दोघे गंभीर जखमी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात अल्टो कार आणि मोटरसायकलच्या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी आहेत. मृतांमध्ये तीन महिला, तीन पुरुष आणि एका लहान बालकाचा समावेश आहे.

प्राथमिक माहितीनुसार दुचाकी आणि कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेनंतर चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार थेट रस्त्यालगत असलेल्या नाल्यात कोसळली. त्यामुळे नाका–तोंडात पाणी जाऊन श्वास घेता न आल्याने कारमधील सातही जणांचा मृत्यू झाला. अपघातात मृत्यू पावलेले सर्वजण नाशिक येथे नातेवाईकाच्या मुलाच्या वाढदिवसासाठी गेले होते.





**राम प्रहर**

**१८व्या वर्षात पदार्पण**

*रायगड, नवी मुंबई परिसरातील अग्रगण्य वृत्तपत्र असलेले दैनिक रामप्रहर आज विश्वासाची यशस्वी १७ वर्षे पूर्ण करून १८व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यामध्ये वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. यापुढेही हे सहकार्य असेच कायम राहावे. वर्धापन दिनानिमित्त 'रामप्रहर' कार्यालयात श्री सत्यनारायणाच्या पुजेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वा.नंतर दर्शन व तीर्थप्रसादाला यावे, ही विनंती.*

*'रामप्रहर' परिवारातर्फे वर्धापन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!*

*–मुख्य संपादक*

# पनवेल–उरणच्या पाणीटंचाईवर आमदार प्रशांत ठाकूर यांचा सिडकोविरोधात संताप

## ऑटोमायझेशनसाठी दोन महिन्यांत निविदा जाहीर करण्याचे मंत्री उदय सामंत यांचे आश्वासन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पाणीपुरवठा व वितरणासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत सिडकोच्या कारभारावर तीव्र नाराजी आणि आक्रमकपणे भावना व्यक्त केल्यानंतर येत्या दोन महिन्यात पाणी वितरणासाठी ऑटोमायझेशनसाठी (स्वयंचलित यंत्रणा) निविदा जाहीर करण्याचे आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी दिले तसेच या निर्देशानुसार कार्यवाही न केल्यास सिडकोच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहात दिले.



सिडकोच्या माध्यमातून पनवेल आणि उरण तालुक्यातील पाण्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली. या वेळी त्यांनी नागरिकांच्या भावना आक्रमकपणे प्रकट केल्या तसेच सिडको अधिकाऱ्यांच्या कारभारावर संताप व्यक्त करत ताशेरे ओढले.

लक्षवेधी सूचनेवर लेखी उत्तरात मोघम उत्तर देण्यात आले होते. त्यामुळे त्याचा उल्लेख करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना म्हटले की, न्हावाशेवा टप्पा ३, बाळगंगा, हेटवणे, मोरबे या सगळ्या धरणांचा इतिहास जवळपास लेखी उत्तरात दिला आहे. त्यामुळे पुढे बोलताना आमदार प्रशांत ठाकूर लक्षवेधी सूचनेत म्हणाले की, बाळगंगापासून सर्व प्रकल्प आता अर्धवट स्थितीत आहेत किंवा कामे चालू स्थितीत आहेत आणि यामधून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा तुडवडा होत राहतो. पाण्याची पाईपलाईन सातत्याने गळत राहते आणि दोन–दोन, तीन–तीन दिवस पाणी बंद केले जाते. खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल, उलवे नोड, करंजाडे, द्रोणागिरी या सर्व वसाहतींमध्ये तुडवडा असल्याने सिडकोविरोधात प्रचंड संताप नागरिकांमध्ये आहे. (पान ५ वर..)






| प्रति महिना | | १० महिने | बोनस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 500 | 10 | 5000 | 1000 | 6000 |
| 1000 | 10 | 10,000 | 2000 | 12000 |
| 2000 | 10 | 20,000 | 4000 | 24000 |
| 3000 | 10 | 30,000 | 6000 | 36000 |
| 5000 | 10 | 50,000 | 10,000 | 60,000 |







## संपादकीय

# लांच्छनास्पद व दुर्दैवी

विधिमंडळाच्या लॉबीत गुरुवारी झालेला कार्यकर्त्यांमधील राडा लोकप्रतिनिधींचीच नव्हे तर महाराष्ट्राची मान खाली घालवणारा आहे. विधिमंडळाच्या आवारात वागताना किमान काही मर्यादा पाळायची असते याचे भान सुटलेले राज्यातील जनतेला पहावे लागले हे दुर्दैवी आहे.

**थेट विधिमंडळातील मारामाऱ्या जम्मू-काश्मीर, दिल्ली, तामिळनाडू, कर्नाटक अशा काही राज्यांमध्ये यापूर्वीही घडल्या आहेत. लोकांनी निवडून दिलेले आमदार आणि नामदार एकमेकांना भिडलेले पाहणे भारतीय मतदारांसाठी नवीन नाही. पण महाराष्ट्र मात्र पुरोगामी विचारांचा मानला जातो. शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव उठता-बसता घेणाऱ्या महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींच्या कार्यकर्त्यांनी थेट विधिमंडळाच्या लॉबीमध्येच हाणामारीवर उतरावे हा प्रकार महाराष्ट्राला निश्चितच शोभादायक नाही. देशाला संविधान देणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही जन्मभूमी आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, साने गुरुजी अशा दीपस्तंभांची ही जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. याच विधिमंडळात अत्यंत जबाबदार लोकप्रतिनिधींनी आपल्या कारकीर्दी गाजवल्या आहेत. महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम विधिमंडळाच्या सभागृहातून होत असते. तेथे विचारांची लढाई तिखट भाषणांनी लढणे अपेक्षित असते. शब्द आणि नियमावली हीच दोन अस्त्रे तेथे वापरली जातात. निदान तसे असणे अपेक्षित आहे. परंतु गुरुवारी झालेला विधिमंडळाच्या लॉबीतील राडा लोकप्रतिनिधींचीच नव्हे तर महाराष्ट्राची मान खाली घालवणारा आहे. सत्ताधारी व विरोधक एकमेकांशी सौहार्दाचे संबंध जोपासतात ही इथली राजकीय संस्कृती आहे. परंतु महाराष्ट्रातल्या राजकीय संस्कृतीची पातळी पार घसरल्याचे दाखवणारा घटनाक्रम कालपरवापासून सुरू होता. बातम्यांमधील व्हिडिओंमार्फत सारे काही जनतेपर्यंत पोहोचत होते. राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेसचे जितेंद्र आव्हाड यांनी अचकट-विचकट टिप्पणी केल्यामुळे संतापलेल्या भारतीय जनता पक्षाच्या गोपीचंद पडळकर यांनी त्यांना शेलक्या शब्दांत प्रत्युत्तर दिले असे बातम्यांमधून दिसले. त्यानंतर हे प्रकरण तिथेच थांबले असते तरी थंड झाले असते. परंतु दोघा लोकप्रतिनिधींमधील बाचाबाचीचे पर्यवसान अखेर गुरुवारी कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी होण्यात झाले. यापैकी फक्त आमदार पडळकर यांनीच खुलेपणाने माध्यमांसमोर येऊन दिलगिरी व्यक्त केली आहे. बाकीच्यांनी तेवढी पर्वा देखील केली नाही. या प्रकरणाची संपूर्ण शहानिशा करून योग्य ती कारवाई करण्यात येईल असे विधानसभाध्यक्षांनी सांगितले आहे. घडलेली घटना योग्य नाही. माननीय अध्यक्ष व सभापती यांनी याची गंभीर दखल घ्यावी व यासंदर्भात कडक कारवाई करावी अशी विनंती आपण केली आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही म्हटले आहे. सीसीटीव्ही चित्रणामधून सत्य काय ते बाहेर येईलच. परंतु जनतेला जे दिसले, ते निश्चितच भूषणावह नव्हते. कोण कुठल्या पक्षाचा हा प्रश्न गौण आहे. मुद्दा आहे तो वर्तनाचा. असे प्रकार पुन्हा घडू नयेत याची दक्षता सर्वांनीच घेतली पाहिजे. गुरुवारचा दिवस मर्यादा सोडून वागण्याचा आणि बोलण्याचा होता की काय, असा प्रश्न पडतो. राज्याच्या विधिमंडळाच्या सभागृहांमध्ये आपण धाडलेले प्रतिनिधी काय करतात याचा विचार मतदारांनी करायला हवा आहे. पुरोगामी महाराष्ट्राला कलंक लागेल अशा पद्धतीचे वर्तन सर्वांनीच टाळायला हवे. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी होत असते. राजकारणातील हेवेदावे, टोकाची भांडणे हे विशिष्ट हेतूने चाललेले असते. त्यात वैयक्तिक काही असण्याचे कारणच नसते. परंतु विधिमंडळाच्या परिसरात तरी सुसंस्कृतपणा निश्चितच सर्वांच्या ठायी असायला हवा. ती किमान अपेक्षा आहे.**

# ‘रामप्रहर’ आणि ‘रामशेठ’ यांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**मधुकर भावे**

‘रामप्रहर’चा आज १७वा वाढदिवस. १८व्या वर्षात ‘रामप्रहर’चे पाऊल पडत असताना १७ वर्षे कशी संपली, हे कळण्याच्या आतच संपून गेली! काळाचा वेग अफाट आहे. या १७ वर्षांत ‘रामप्रहर’ दैनिकाने पत्रकारितेची सर्व पथ्ये पाळून रायगड जिल्ह्यात एक प्रतिष्ठित स्थान निर्माण केले आहे. मराठी पत्रकारितेच्या सगळ्या महान परंपरा सांभाळून ‘रामप्रहर’ १७ वर्ष वाचकांच्या समोर आहे. ‘रामप्रहर’ची संकल्पना श्री. रामशेठ ठाकूर या व्यक्तिमत्वाच्या, नेतृत्वाच्या आणि कर्तृत्वाच्या नेत्याने मराठी पत्रकारितेला दिलेली एक अनमोल भेट आहे.

१८ जुलै २००८ साली ‘रामप्रहर’चा पहिला अंक प्रकाशित झाला. त्या दिवशी मुंबई, महाराष्ट्र धो..धो.. पाऊस कोसळत होता. तो दिवस गुरूपोर्णिमेचा पवित्र दिवस होता.. तेव्हा ‘रामप्रहर’च्या जन्मदिनाच्या दिवसापासूनच पनवेलमधील पत्रकारितेचा शुभदिवस सुरू झाला, अशी माझी मनापासूनची भावना आहे. प्रकाशनाचा कार्यक्रम कुठे करायचा? या प्रकाशन कार्यक्रमाला त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या हस्ते हा कार्यक्रम व्हावा, अशी सर्वांची इच्छा होती. त्यावेळी विधानसभेचे अधिवेशन सुरू होते... अधिवेशन सोडून कार्यक्रमासाठी वेळ काढणे कठीण असताना विलासरावांनी एका मिनिटात पर्याय सुचविला. ’मुंबई विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृहात’ या कार्यक्रमाचे प्रकाशन करता येईल, असे विलासरावांनी सुचविले. रामशेठ यांच्या वृत्तपत्राचे कार्यक्रम दणदणीत व्हावे, त्यांच्या वृत्तपत्राचे प्रकाशन दणदणीत व्हावे ही त्यांची भावना होती. विलासरावांनी लगेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. विजय खोलेसाहेब यांना फोन लावला आणि एका मिनिटात हे सभागृह या कार्यक्रमाला उपलब्ध करून दिले. हा तपशील एवढ्याकरिता सांगतो आहे की, जिल्हा पातळीवरच्या दैनिकाचे प्रकाशन एवढ्या दणदणीत स्वरूपाचे व्हावे, हा मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहातील इतिहासातला महाराष्ट्रातला एकमेव कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम व्हावा अशी विलासरावांची इच्छा आणि रामशेठ ठाकूर यांच्यावर असलेले त्यांचे प्रेम याचे निदर्शक होते आणि आहे.

रामशेठ व्यवसायिकदृष्ट्या पूर्णपणे यशस्वी झाले असले तरी वृत्तपत्राच्या व्यवसायाला हात घालून एखादे वृत्तपत्र सलग १७ वर्ष चालविणे हे सोपे काम नाही. ‘सिंघानिया’सारख्या ‘रेमंड’ उद्योग समुहाच्या व्यवस्थापनाला ‘इंडियन पोस्ट’ हे वृत्तपत्र मुंबई सलग दोन वर्षे चालविता आले नाही. दिल्लीच्या हिंदुस्थान टाईम्ससारख्या नामांकित वृत्तपत्रालाही वृत्तपत्र मुंबईत सुरू केल्यावर बंद करावे लागले. वृत्तपत्र मोठे की छोटे आहे हा मुद्दा गौण आहे. त्यामागची प्रेरणा, भूमिका आणि सातत्य... या त्रिसूत्रीवर वृत्तपत्र चालत असते. ‘वाचकांचा विश्वास’ हे वृत्तपत्राचे सर्वात मोठ भांडवल आहे. वृत्तपत्राचा खरा मालक ‘वाचक’ आहे. रामशेठ ठाकूर यांचे कौतुक अशाकरिता वाटते की, त्यांनी या व्यवसायात पाऊल ठेवल्यावर अतिशय समर्पणाच्या भावनेने हे वृत्तपत्र सातत्याने चालू ठेवले आहे. दर्जा आणि प्रतिष्ठा कायम ठेवली आहे. राजकारणातली मूल्ये त्यांनी जोपासली आहेत. रामशेठ शे.का. पक्षात होते तेव्हा जीव पणाला लावून त्यांनी शे.का.पक्षाचे काम केले. काँग्रेसमध्ये येत असताना त्यांनी आपले पूर्वीचे सगळे राजकीय संबंध त्याचप्रमाणे पूर्ववत टिकवून ठेवले.



**१८ जुलै २००८ : गुरूपौर्णिमा : ‘रामप्रहर’ दैनिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते झाले तो क्षण.**

दि.बा. पाटीलसाहेब यांचे नेतृत्व मान्य केलेल्या रामशेठ यांनी दि.बा. पाटील यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव केल्यानंतरसुद्धा ‘नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव द्या’ यासाठी लाखांचा मोर्चा काढणारे रामशेठच होते. रामशेठ यांनी कोणतेही राजकारण हे व्यक्तीद्वेषातून केले नाही. राजकारणातल्या मूल्यांच्या परंपरा त्यांनी कायम जपल्या आहेत. त्यामुळे शे.का. पक्षात असताना ‘शेकाप’ पनवेलमधील कार्यालयाच्या जागेची मालकी रामशेठ यांचीच होती. पक्ष सोडताना त्यांनी त्या जागेची मालकीही शे.का. पक्षाला देऊन टाकली. हा रामशेठ यांच्या मनाचा मोठेपणा त्यांच्या यशाचे मुख्य कारण आहे. ‘रामप्रहर’चे यश हे रामशेठच यांचेच यश आहे. राजकारणात स्वत:ला किती बुडवून घ्यायचे याचा निर्णय करण्याची क्षमता रामशेठ यांच्यामध्ये आहे. म्हणूनच त्यांनी लोकसभेच्या दोन निवडणुका जिकल्यानंतर पुन्हा निवडणूक न लढविण्याची घोषणा केली. हा त्यांचा राजकीय नितळपणा आहे. ८० टक्के सामाजिक कार्याची घोषणा ही रामशेठ यांची मुख्य शक्तीस्थाने आहेत. ‘रामप्रहर’चा वैचारिक पाया रामशेठ यांच्या सार्वजनिक जीवनातील त्यांच्या चारित्र्याचाही एक मोठा आदर्श आहे. म्हणून ‘रामप्रहर’चे यश टिकून आहे, कारण ८० टक्के समाजकारण करताना रामशेठ यांनी राजकीय भूमिकेतून कधीही समाजकारण केले नाही. त्यांच्याकडे कामासाठी येणाऱ्या गर्दीमध्ये कोण कोणत्या पक्षाचा, कोणत्या जातीचा, कोणत्या धर्माचा आहे याचा विचार रामशेठ यांनी कधीही केला नाही हेही त्यांचे मोठे शक्तीस्थान आहे आणि ‘रामप्रहर’चे शक्तीस्थानही तेच आहे. कोणाचीही बातमी मारायची नाही ही भूमिका रामशेठ यांनी पहिल्यापासून घेतली असल्याने ‘रामप्रहर’नेही ते व्रत आजपर्यंत पाळले आहे. त्यामुळे रामशेठ जरी आज भाजपमध्ये असले तरी ‘रामप्रहर’ वृत्तपत्र एका पक्षाचे वृत्तपत्र आहे असे त्यांनी कधी होऊ दिले नाही. हेही रामशेठ यांच्या मनाचे मोठेपण आहे.

स्वत:चे वृत्तपत्र त्यांच्या हातात असताना त्यांनी रायगड जिल्ह्यातील आणि मुंबई, महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांना जाहिरातींमार्फत आपला उदार हात पुढे केला आहे. अन्य वृत्तपत्रात रामशेठ यांनी दिलेल्या जाहिरातींच्या बदल्यात ‘रामशेठ यांच्याबद्दल अमुक अमुक छापा’, असा आग्रह त्यांनी कधीही धरला नाही. आलेल्या माणसाला मदत करणे एवढेच एकमेव काम ते करीत असतात. त्याच्या बदल्यात प्रसिद्धीची हाव त्यांनी कधीही केली नाही. मराठी वृत्तपत्राप्रमाणेच मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या मराठी दिवाळी अंकांना रामशेठ यांनी मोठी पारितोषिके देऊन दिवाळी अंकांचे वैभव वाढविले आहे. त्या बदल्यात एकाही दिवाळी अंकात त्यांनी स्वत:बद्दल काही छापून आण्याचा आग्रह कधीही धरलेला नाही. त्यांचे सामाजिक काम आणि त्यांची साामाजिक बांधिलकी निर्लेप आहे. त्यामुळे व्यवसायातील रामशेठ.. समाजकारणातले रामशेठ.. राजकारणातले रामशेठ.. रयत शिक्षण संस्थेमध्ये शिकल्यामुळे ते ऋण मान्य करून रयत संस्थेसाठी सातारा आणि मोखाडा येथे महाविद्यालये बांधून देणारे शैक्षणिक क्षेत्रातील रामशेठ.. पत्रकारितेतले रामशेठ.. आणि असे त्यांचे अनेक चेहरे असले तरी मुख्य म्हणजे या सर्व व्यापात रामशेठमधला मनाचा मोठा माणूस कधीही हरवला नाही आणि रामशेठ यांच्या प्रत्येक यशामागे त्यांचा हा सरळ साधा चारित्र्यसंपन्न स्वभाव, त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तिबद्दलचा आदर हेही त्यांचे फार मोठे शक्तीस्थान आहे. त्यामुळे रामशेठ सगळ्यांना आपलेसे वाटतात. तिथे राजकीय विचारधारा गळून पडते आणि मैत्रीचे नाते तयार होते. यासाठी वागण्यात सरळपणा लागतो, साधेपणा लागतो. तो साधेपणा रामशेठ यांनी कायम जपल्यामुळे रामशेठ ही एक व्यक्ती राहिली नसून ती सामाजिक शक्ती बनली आहे. ‘रामप्रहर’चा वैचारिक पाया त्यामुळेच त्याच भूमिकेवर पक्का झालेला आहे.

‘लोकमत’च्या संपादकपदावरून मी २००८मध्ये निवृत्त झाल्यानंतर ६८व्या वर्षी मला ‘रामप्रहर’चे संपादकपद रामशेठ यांनी दिले. त्या चार वर्षाच्या काळात रामशेठ यांचे व्यक्तिमत्व नव्याने पाहता आले. त्याचे विश्लेषण वेगळ्या पद्धतीने करता आले. ‘लांबून दिसणारे रामशेठ’ आणि ‘सहवासातले रामशेठ’ यातला फरक चार वर्षात वेगळा आनंद देऊन गेला. ‘रामप्रहर’ची चार वर्ष आणि ती चार वर्षांची पत्रकारिता विसरता येणे शक्य नाही. पत्रकारितेतील बारकावे रामशेठ यांना किती नेमके समजले आहेत हेही या चार वर्षात जवळून पाहता आले. ‘रामप्रहर’चे प्रत्येक पान काळजीपूर्वक वाचून आवश्यकतेनुसार सूचना करणाऱ्या रामशेठ यांच्यामधील ‘संपादक’ही मला चार वर्षात पाहता आला. रामशेठ आणि त्यांच्या परिवारातील आमदार प्रशांत ठाकूर किंवा परेश ठाकूर या सगळ्या व्यक्तिमत्वांना बरेच काही समजू शकलो. आमदार प्रशांत ठाकूर हे आता सलग चार वेळा (सुमारे २० वर्षांच्या कालावधीसाठी) निवडून आलेले आमदार आहेत. त्याची सुरुवात ‘रामप्रहर’ने पाहिली आहे. ते यावेळी मंत्री झाले असते तर अधिक चांगले झाले असते... तसेच परेश ठाकूर यांच्याबद्दलही माझ्या मनात एक वेगळी जागा आहे, कारण महाराष्ट्रात कवीकुलभूषण कालिदास यांची जयंती साजरी करणारा हा एकमेव तरुण नेता आहे.

चार वर्षातील रामशेठ ठाकूर आणि ‘रामप्रहर’ परिवाराशी जुळलेले संबंध एवढे भावनिक आहेत की, मनाच्या कोपऱ्यात ते कायम जपून ठेवावेत अशीच माझी भावना आहे आणि म्हणून ‘रामप्रहर’चा वाढदिवस’ किंवा ‘रामशेठ यांचा वाढदिवस’ हे दोन्ही दिवस आयुष्यात ऊर्जा देणारे दिवस आहेत, असेच मी मानतो. ‘रामप्रहर’मधल्या सर्व सहकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.. ‘रामप्रहर’ आणि रामशेठ यांना मन:पूर्वक शुभेच्छा!




## पावसाळ्यात इलेक्ट्रिक गाड्यांची ‘अशी’ घ्या काळजी

देशभरात मान्सून सुरू झाला असून, उष्णतेपासून लोकांना दिलासा मिळाला आहे, परंतु हा हंगाम अनेक लोकांसाठी चिंताजनक बनला आहे कारण पावसामुळे रस्ते, तळघर पार्किंग आणि इतर ठिकाणी तुंबून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. इलेक्ट्रिक कारसाठी ही समस्या अधिक वाढते आणि त्यामुळे वाहनाचे अधिक नुकसान होते. अशा परिस्थितीत तुम्हीही इलेक्ट्रिक कार चालवत असाल तर आज आम्ही तुम्हाला अशाच काही टिप्स सांगणार आहोत, ज्याचा अवलंब करून तुम्ही पावसाळ्यातही तुमचे इलेक्ट्रिक वाहन सुरक्षित ठेवू शकता.



चार्जिंग डिव्हाइस सुरक्षित ठेवा : पावसाळ्यात इलेक्ट्रिक वाहन सुरक्षित ठेवण्यासाठी चार्जिंग उपकरणे सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्ही तुमच्या घराबाहेर चार्जिंग स्टेशन लावले असेल किंवा पोर्टेबल चार्जर वापरला असेल, तर त्यातील पाणी शॉर्ट सर्किट होऊन तुमच्या वाहनातील आवश्यक उपकरणे खराब करू शकते.

चार्जिंग करतांना घ्यावी काळजी : पावसाळ्यात इलेक्ट्रिक वाहनांचे बॅटरीचे चार्जिंग करतांना खास काळजी घेणे गरजेचे आहे. जर पाऊस पडत असेल तर व्यवस्थित झाकलेल्या आणि कोरड्या भागात चार्जिंग करावे. चार्जिंगसाठी प्लग करण्यापूर्वी शॉर्टसर्किट टाळण्यासाठी वाहन प्लग कोरडा आहे ना याची काळजी घ्यावी.

कोणत्याही इलेक्ट्रिक वाहनाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे बॅटरी. त्यामुळे त्याची गळती, इन्सुलेशन किंवा कनेक्टर वेळोवेळी तपासा.

पाणी भरलेल्या रस्त्यावर वाहन चालवू नका : जास्त पाणी साचलेल्या रस्त्यावर तुमचे इलेक्ट्रिक वाहन नेऊ नका. ईव्हीमध्ये भरपूर संवेदनशील इलेक्ट्रॉनिक्स आणि सेन्सर असल्यामुळे ते पाण्यामुळे खराब होऊ शकतात तसेच तुमच्या वाहनाच्या बॅटरी पॅकचे आयपी रेटिंग जाणून घ्या.

टायर्सची काळजी घ्या : पावसाळ्यात वाहनांच्या टायर्सवर सर्वात जास्त परिणाम होतो. पाण्यात गेलेले खड्डे दिसत नाहीत. त्यामुळे गाडीचे टायर्स आपटले जातात. त्यामुळे टायर्स फुटण्याची जास्त शक्यता असते. तसेच रस्ते निसरडे झाल्याने गाडी स्लीप होण्याचीही भीती असते.

# प्रतिभावंत साहित्यिक : अण्णा भाऊ साठे

साहित्यरत्न अण्णा भाऊंचा जन्म मातंग जातीत १ ऑगस्ट १९२० रोजी सांगलीतील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव सिद्धोजी साठे, तर आईचे नाव वालूबाई साठे होते. मुंबईतील चिरागनगरीच्या झोपडपट्टीत अत्यंत हालाखीच्या अवस्थेत १८ जुलै १९६९ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, ११ पोवाडे, एक प्रवासवर्णन आणि शेकडो लावण्या, छकडी, गाणी लिहिली आहे. मराठी साहित्याला क्रांतीचा उर्जास्त्रोत देणारे लोकशाहीर म्हणून ते सुपरिचित आहेत. ’माणूस’ हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू आहे. त्यांचे साहित्य हे तत्कालीन काळातील वास्तव जीवनाचे अपत्य आहे. त्यांच्या साहित्यातून त्यांनी वंचित आणि उपेक्षित समाजाच्या तळागाळातील जातीजमाती, सवर्ण आणि दलित माणसांचे जीवन मांडले आहे. त्याला वास्तवतेची धार आहे. त्यांचे साहित्य बंड, क्रांती आणि विद्रोहाची विचारशलाका आहे. त्यांच्या साहित्यात स्वातंत्र्याचे पंख लावून भरारी मारावयाच्या जगण्याचे तत्त्वज्ञान आहे. ’ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून, ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे,’ अशी विज्ञानवादी भूमिका त्यांनी मांडली आहे. मात्र, तरीही या साहित्यिकांची नेहमीच उपेक्षा झाली आहे.

भांडवलशाही, मुंबईतील विषमता यांच्याविरोधात त्यांनी रणशिंग फुंकले आहे. त्यांचा वाटेगाव ते मुंबई हा प्रवास अतिशय वेदनादायी आहे. साम्यवादी विचाराने अण्णा भाऊ भारावलेले होते. मुंबईत लाल बावटा कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार केला. शाहीर अमर शेख, द. ना. गव्हाणकर, कॉ. डांगे यांच्याप्रमाणे मार्क्सवादी चळवळ व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी माणसे जोडली. पुरोगामी विचारांचा अखंड महाराष्ट्र घडवून जगात महाराष्ट्राचे नाव कोरले जावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दलितांच्या गुलामगिरीच्या विरोधात आवाज उठवला.



**निमित्त**

नारायण सुर्वे यांनी म्हटल्याप्रमाणे अण्णांमुळे तमाशाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. तमाशाचा ढाचा बदलला. पूर्वीचे पारंपरिक अध्यात्म, पौराणिकता, आख्यानवजा स्वरूप बदलले. माणसाचं माणूसपण जपणारा साहित्यिक, सतत चळवळीत असणारा असा चळवळ जगलेला शाहीर म्हणून त्यांचे नावलौकिक आहे. त्यांच्या साहित्यात विद्रोहाची आग, धग आहे. जनतेची कदर करणारा कलावंत आहे. त्यांचे साहित्य वैचारिक असून, त्याला परंपरेच्या विरोधात परिवर्तनाची आणि सत्यशोधकी विचारांची धार आहे. बहुजन चळवळीचे नायक आहेत. अण्णा भाऊ ’दलित कथेचे शिल्पकार’ आणि ’जय भीम, लाल सलाम’ संकल्पनेचे पुरस्कर्ते आहेत. ’माझा रशियाचा प्रवास’मधून त्यांनी समाजवादाची भूमिका मांडली.

दु:ख, दैन्य आणि दारिद्र्याच्या साखळदंडात सापडूनही अण्णांनी विपुल अशी साहित्यसंपदा निर्माण केली. त्यांचे साहित्य भारतासह रशिया, झेक, पोलंड, जर्मन अशा २७ भाषेत भाषांतरित झाले आहे. या साहित्यप्रतिभेच्या महामेरूला सरकारने ’भारतरत्न’ घोषित करावे आणि ज्ञानपीठ पुरस्कारही द्यावा. जयंतीनिमित्त अण्णांना कोटी कोटी प्रणाम..


**-डॉ. रामशेट्टी शेटकार**

## बातमीतील बात




## आंतरराष्ट्रीय नेल्सन मंडेला दिन

संयुक्त राष्ट्रसंघातर्फे आजचा हा दिवस आंतरराष्ट्रीय नेल्सन मंडेला दिन म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकशाहीसाठी संघर्ष आणि जगभरातील शांतता वाढविण्यात नेल्सन मंडेला यांनी दिलेल्या योगदानाच्या स्मरणार्थ हा दिवस पाळण्यात येतो. १८ जुलै २००९ रोजी न्यूयॉर्कमध्ये प्रथम मंडेला दिन साजरा करण्यात आला.



संयुक्त राष्ट्र महासभेने १० नोव्हेंबर २००९ रोजी एक ठराव संमत करून १८ जुलैला आंतरराष्ट्रीय नेल्सन मंडेला दिन म्हणून घोषित केले.

दक्षिण आफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष हे नेल्सन मंडेला होते. संयुक्त राष्ट्र महासभेने नोव्हेंबर २००९मध्ये शांतता आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात मंडेला यांच्या पूर्वीच्या योगदानाची ओळख म्हणून या दिवसाची स्थापना केली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# स्वच्छ सर्वेक्षणामध्ये पनवेल मनपाचा देशात सहावा क्रमांक

## ◆ कचरामुक्त शहर मानांकनात थ्री स्टार
## ◆ ओडीएफमध्ये सर्वोच्च वॉटरप्लस मानांकन कायम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहराने स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५मध्ये देशपातळीवर आणि राज्यपातळीवर भरीव कामगिरी बजावली आहे. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या स्वच्छतेच्या सर्वेक्षणामध्ये या वर्षी तीन लाख ते दहा लाख लोकसंख्या गटात पनवेल महानगरपालिकेला देशात सहावा क्रमांक प्राप्त झाला आहे. हा सन्मान म्हणजे पनवेल शहराच्या स्वच्छतेसाठी करण्यात आलेल्या कार्याची पावती आहे. कचरामुक्त शहर मानांकनात थ्री स्टार आणि ओडीएफमध्ये सर्वोच्च वॉटरप्लस ही सर्वोच्च श्रेणीदेखील शहराने सलग राखली आहे.



महापालिकेस मिळालेल्या या यशाबद्दल गुरुवारी (दि. १७) झालेल्या प्रशासकीय महासभेत आयुक्त मंगेश चितळे यांनी घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते व त्यांच्या टिमचे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. स्वच्छतेच्या आघाडीवर केवळ क्रमांकच नव्हे तर गुणवत्तेचेही मानांकन मिळवण्यात पनवेल महानगरपालिकेला यश आले आहे. या यशाबरोबरच पनवेल महानगरपालिकेने आपल्या यशाची परंपरा कायम राखत कचरामुक्त शहर मानांकनात थ्री स्टार मानांकन शहराने सलग चौथ्या वर्षी कायम राखले आहे. याशिवाय स्वच्छ भारत अभियानांतर्गत सार्वजनिक शौचालयांची व्यवस्था, सांडपाणी व्यवस्थापन व स्वच्छतागृह वापर यामधील उत्कृष्ट कार्यासाठी कॅटेगरी मधील वॉटरप्लस ही सर्वोच्च श्रेणीदेखील शहराने सलग राखली आहे. हे मानांकन शहरातील स्वच्छतेबाबतची नागरिकांची जाणीव, शिस्तबद्धता आणि महानगरपालिकेच्या सततच्या प्रयत्नांचे फलित आहे.

या यशामध्ये महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांचे कुशल मार्गदर्शन तसेच उपायुक्त डॉ. वैभव विधाते आणि सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक, महापालिका अभियंता, स्वच्छता निरीक्षक आणि स्वच्छता कर्मचारी यांच्या टीमने संपूर्ण अभियानासाठी विशेष नियोजन, मार्गदर्शन आणि अंमलबजावणी करीता उल्लेखनीय मेहनत घेतली. सर्वेक्षणाच्या वेळी शहरातील विविध स्वच्छता उपक्रम, जनजागृती मोहिमा, नागरिकांचा सहभाग आणि तांत्रिक व व्यवहार्य उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. यामुळेच पनवेल शहर हे स्वच्छतेच्या बाबतीत एक आदर्श मॉडेल ठरले आहे.

पनवेल महापालिकेच्या या यशात नागरिकांचा सहभागदेखील तितकाच मोलाचा ठरला आहे. लोकप्रतिनिधी व नागरिकांचे प्रशासनास दिलेले सहकार्य यामुळेच ही संपूर्ण प्रक्रिया यशस्वी झाली.

# कोट्यवधींच्या फसवणूकप्रकरणी प्रसन्न पुलेकरला अटक

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहर व ग्रामीण भागातील जनतेस कमीत कमी एक लाख रुपये गुंतवल्यास प्रत्येक महिन्यास दहा हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची गुणवणूक करणारा व तद्नंतर पैसे देण्यास नकार देणारा प्रसन्न पुलेकर यास मुरुड पोलिसांनी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अटक करुन त्याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



महेश भगत यांनी व त्यांच्यासह १३६ जणांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार मुरुड पोलीस ठाण्यात नोंदवली होती. सुमारे आतापर्यंत तक्रार दाखल झाल्यानंतर किमान आठ कोटी एक लाख २५ हजार रुपये फसवणूक झाल्याबाबत मुरुड पोलिस ठाण्यात अनेकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारीनुसार मुरूड पोलीस प्रसन्न पुलेकर याच्या शोधात होते. मुरुड दिवाणी न्यायालयात एका केसबाबत तो आला असता त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. या वेळी मुरुड पोलिसांनी त्याची कसून चौकशी करुन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मेघरे, कारविणे, गालसुरे धबधबा, बाणगंगा, सायगाव धरण क्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश

**रायगड :** श्रीवर्धन पोलीस ठाणे हददीतील धबधबा, धरण व तलाव क्षेत्रात मान्सून कालावधीमध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीवर नियंत्रण ठेवणे पोलीस प्रशासनास त्रासदायक ठरते, तसेच मान्सून कालावधीमध्ये धरण, धबधबे व तलाव पूर्ण भरुन वाहत असतात व मान्सुन मुळे आजुबाजुच्या डोंगर कपाऱ्यांमधून धबधबे सुरु होतात. या भागांमध्ये पाण्यात बुडुन मृत्युबाबत घटना घडल्या आहेत.

यावर्षी कोणत्याही प्रकारे धबधबा, धरण व तलाव या क्षेत्रात लोकांची गर्दी व जिवीत हानी होऊ नये याकरीता ह्या परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३चे कलम १६३ अन्वये पुढीलबाबींकरिता २६ जून ते३० सप्टेंबर या कालावधीकरिता उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांनी प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी केला आहे.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे शिरढोण, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली बिनशेती असलेली जमीन विद्यमान कब्जेदार रिजवाना हसन मापारी यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**बिनशेती जमीनीचे वर्णन**

**मौजे शिरढोण, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र पनवेल इंदापुर रस्त्याकरीता संपादीत करण्यात आलेले क्षेत्र वगळून |
|---|---|---|
| १८७/१/अ/२ | १ | ०-१५-०० (१५०० चौ.मी) |
| १८७/१/ब | १ | ०-०८-०० (८०० चौ.मी) |
| १८८/अ | १ | ०-००-४० |

वरील बिनशेती जमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १७/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

## पनवेल महानगरपालिका

**शिक्षण विभाग, लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल - ४१० २०६.**

Email: msbpanvel1993@gmail.com   Emai: panvelcorporation@gmail.com

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

| अ.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | दरपत्रक/पमपा/शिक्षण/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिकेतील शाळेतील विद्यार्थ्यांकरीता इ.१ली ते ८ वी या वर्गातील किल्ले प्रतिकृती तयार करणेबाबत. |

या निविदेबाबतची माहिती दैनिक वृत्तपत्रात तसेच मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि.१८/०७/ २०२५ ते दि. २४/०७/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका (लोकनेते दि.बा. पाटील विदयालय,) येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची सविस्तर माहिती पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात प्राप्त होईल याची संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ३२८/३४१/२०२५**
**दिनांक :- १७/०७/२०२५**

**सही/-**
**सहा. आयुक्त (शिक्षण)**
**पनवेल महानगरपालिका**

## रोहा नगर परिषद, रोहा

ःद पवार भवन, प्रशासकिय कार्यालय ईमारत, पहिला मजला
ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७ email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/कर विभाग/जा.नो.प्र/६५७/२०२५-२०२६   दिनांक - १६-०७-२०२५

**जाहीर निविदा सूचना**

रोहा नगर परिषदेची मार्तंड व्यायामशाळा सन २०२५-२६ पासून तीन वर्षाच्या मुदतीने आउटपूट बेसीसवर चालविणेस देणेकामी इच्छूक संस्था अथवा व्यक्ती यांचेकडून निविदा मागवित आहे. कोऱ्या निविदा फॉर्म नगर परिषद कार्यालयातील कर विभागामध्ये कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत दिनांक २४-०७-२०२५ पर्यंत प्राप्त करून घेता येतील. तसेच, सिलबंद निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक २५-०७-२०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत असेल. अधिक माहितीकरिता रोहा नगर परिषदेचे कर विभागामध्ये संपर्क साधावा

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वांगणी तर्फे वाजे, तहसील-पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. गुरूनाथ अनंता करमेलकर, श्री नितीन अनंता म्हात्रे, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे वागंणी तर्फे वाजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| ११९ | १ | ०-३७-९० | ०-००-०० | ०-३७-९० | ८.५० |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजण्यात येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १७/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

पान ३ वरून

## भाजपच्या आक्रमक भूमिकेनंतर पनवेल मनपा क्षेत्रात मालमत्ता करावरील शास्ती माफीची अभय योजना लागू



सर्वोच्च न्यायालय तसेच मुंबई उच्च न्यायालयातसुद्धा याचिका दाखल झाल्याने न्यायालयाकडून कोणताही दिलासा पनवेलच्या मालमत्ता करधारकांना मिळू शकला नाही. विरोधी पक्ष विशेषत्वाने शिवसेना ठाकरे गट नेत्या म्हणणाऱ्यांनी यामध्ये राजकारण केले आणि त्यातून निवडणुकीत स्वतःच्या पदरात मते पाडून घेतली. नागरिकांना भडकविण्याचे काम केले. न्यायालयातील याचिकांचा दाखला देत टॅक्स न भरण्याचे आवाहन करत नागरिकांना कर भरण्यास रोखले.

आयुक्तांनी करधारकांना दिलासा देताना एकवेळची विशेष बाब म्हणून ही अभय योजना आणत असल्याचे स्पष्ट केले. जे नागरिक १८ जुलै ते १५ ऑगस्टपर्यंत कर भरतील अशांना ९० टक्के शास्ती माफी दिली जाणार आहे तसेच १६ ते ३१ ऑगस्टपर्यंत कर भरणाऱ्यांना ७५ टक्के, १ ते १० सप्टेंबरपर्यंत कर भरणाऱ्यांना ५० टक्के शास्ती माफी आणि ११ ते २० सप्टेंबरदरम्यान कर भरणाऱ्यांना यांना २५ टक्के शास्ती माफी केली जाईल, असेही आयुक्तांनी सांगितले.

शास्ती माफीचे काही प्रश्न करदात्यांचे असल्यास महापालिकेच्या प्रत्येक प्रभाग कार्यालयात व करसंकलन केंद्रात नागरिक संपर्क साधू शकतील. सर्वाधिक थकीत कराची रक्कम आणि शास्तीची रक्कम औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांची आणि व्यावसायिकांची आहे. त्यामुळे या निर्णयाचा निवासी वापर करणाऱ्या करदात्यांसोबत कोट्यवधी रुपयांची शास्ती माफी वाणिज्य व उद्योजकांची होणार आहे.

## पनवेल-उरणच्या पाणीटंचाईवर आमदार प्रशांत ठाकूर यांचा सिडकोविरोधात संताप

येथील नागरिक मध्यमवर्गीय आहेत आणि कदाचित त्यांच्या कुटुंबातील दोन्हीही व्यक्ती उद्योगधंदा करतात किंवा नोकरीला जातात. अशा वेळेला पाणीच नसेल तर आंघोळ करू शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या लोकांची चिडचिड व त्यांना संताप होत असतो. ते आपल्या व्यथा आमच्याकडे सतत मांडत असतात, दिवाळीच्या दिवशीही घरात पाणी नाही असे सांगतात.

कितीही मागणी बैठका घेतल्या तरी अधिकाऱ्यांवर याचा काहीही फरक पडत नाही. वरिष्ठ अधिकारी या बाबतीत तर पूर्णपणे उदासीन आहेत आणि ते केवळ वेळ मारून नेतात. आम्ही धरण बांधतोय असे सांगतात, मात्र उपाय निघत नाही. लोकांना आज पाणी हवे आहे आणि अधिकारी उद्या येणार आहे असे सांगतात, तर आजच्या दिवशी काय करायचे हा प्रश्न नागरिकांमध्ये असून पाण्याविषयाच्या बाबतीत सिडकोचा पूर्ण आनंद आहे. टाटा कन्सल्ट एजन्सी नेमली गेली. या एजन्सीने काम केले की त्यांनी पैसे खाल्ले, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत एअर इंडियाचे झाले तसे येथेही टाटा कन्सल्टची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. गेल्या सहा महिन्यापासून हे टेंडर निघत नाही. मी तर गेल्या वर्षभरापासून मागणी करत होतो. टाटा कन्सल्टन्ट एजन्सीचा अहवाल सिडकोकडे येऊन दीड वर्ष झाले आहे. मग पुढील कार्यवाही का करत नाही? यासाठी सिडकोकडे पैशाची कमतरता आहे का, असा सवालही उपस्थित केला.

सिडको विमानतळ बांधत आहे, कोट्यवधींचे प्रकल्प उभारत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पुढे होणाऱ्या वसाहतींचे पाण्याअभावी काय चित्र राहणार आहे याचीही कल्पना करायला हवी. पाणी वितरणामध्ये पाईपलाईनची दुरूस्ती करणारे, पम्प हाऊस चालविणारे, टँकर पुरवणारे ठेकेदार तसेच अभियंता सर्व मिळून पैसे खातात. यांचे कोट्यवधी रुपयांचे फ्लॅट होतात आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना याचे काहीही घेणे देणे नाही. पाणी वितरणाच्या बाबतीत ऑटोमायझेशन झाले पाहिजे यासाठी आम्ही मागणी करून करून थकलो, मात्र सिडकोच्या अधिकाऱ्यांना याच्याशी घेणे देणे नाही. अधिकारी राहतात त्या ठिकाणी मॅन्युअल चावी फिरवून भरपूर पाणी आणि ठराविक ठिकाणी मात्र पाणीच नाही. त्यामुळे हे बंद करायचे असेल, तर ऑटोमायझेशनशिवाय पर्याय नाही. टँकरची व्यवस्था ही पर्यायी व्यवस्था आहे. खरंतर पाईपलाईनेच पाणी मिळाले पाहिजे आणि त्यासाठी सिडकोने कोट्यवधी रुपये शुल्क इमारतींकडून वसूल केले आहे. सिडकोची व्यवस्था सदोष आहे हे माझे यापूर्वीही बोलून झाले आहे. वसाहती वाढत चालल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेची ९० हजार घरे या वसाहतीमध्ये उभी राहत आहेत. मग त्यांना पाणी कुठून देणार, असा सवालही आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित करत यावरही शासनाचे लक्ष केंद्रित केले.

रोज नवीन इमारत उभी होते आणि पाणी मिळत नाही अशी ओरड नागरिक लोकप्रतिनिधींकडे करतात. त्यामुळे जर आधीच्याच इमारतींना पाणी मिळत नसेल, तर सिडकोने नव्या सीसी, ओसी देणे थांबवले पाहिजे आणि हाच यावरील उपाय आहे. पाणीपुरवठ्यासंदर्भात अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना दिलेली उत्तरे ही केवळ अधिकाऱ्यांचा वेळकाढूपणा आहे. लोकं संतप्त आहेत याची जाणीव अधिकाऱ्यांना नाही. सीसी, ओसी थांबवली तरच त्याची झळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना लागेल. त्यामुळे या बाबतीत शासनाने गंभीर झाले पाहिजे, अशी जोरदार मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत नागरिकांच्या भावना विधीमंडळात मांडल्या.

मंत्री उदय सामंत यांनी उत्तर देताना, आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाण्याच्या संदर्भात तीव्र भावना आक्रमपणे मांडल्या आहेत त्याची दखल शासन घेणार असल्याचे सांगितले. काहीही करा, मॅन्युअल प्रणाली बंद करून ऑटोमायझेशनकडे जात नाही तोपर्यंत यावर योग्य पर्याय निघणार नाही असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले आहे. सीसी, ओसी थांबवणे संयुक्तिक होणार नाही, मात्र पाण्याची पातळी, पुरवठा, साठवण या संदर्भात बघितल्यानंतर ३१९ एमएलडी पाण्याचा आपण पुरवठा करीत आहोत. २३ एमएलडीचा फरक आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. दोन वर्षांत काही प्रकल्प होणार आहेत, मग ते होईपर्यंत पाण्यासाठी थांबायचे का हे त्यांचे म्हणणे सकारात्मक आणि बरोबर आहे. जोपर्यंत पाणी वितरणाचे ऑटोमायझेशन होत नाही तोपर्यंत त्याला पर्याय निघणार नाही. त्यामुळे दोन महिन्याच्या आत या संदर्भातील निविदा जाहीर करण्याचे निर्देश सिडकोला आजच दिले जातील, असे आश्वासन देणार असल्याचे मंत्री सामंत यांनी आश्वासित केले. त्याचबरोबर यामध्ये अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले, तर त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलणार असल्याचेही त्यांनी या वेळी आपल्या निर्देशात स्पष्ट केले.

**पाण्याच्या प्रश्नाला फुटली वाचा!**

*विकासकामे असो किंवा नागरिकांना भेडसावणारे प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासन दरबारी मांडून नागरिकांना कायम न्याय मिळवून दिला आहे. वेळ पडल्यास त्यांनी लोकांसाठी आपल्या पदाचा विचार केला नाही. आज त्यांनी सभागृहात बोलताना सिडकोच्या कारभाराविषयी तीव्र संताप व्यक्त केला, मात्र त्यासोबतच प्रशासनाचा कारभार राहिला, तर लोकप्रतिनिधींना राजिनामा दिल्याशिवाय पर्याय राहणार नाही, अशी खंत व्यक्त केली. अभ्यासपूर्ण मांडणीत त्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय कारभाराचे वाभाडे काढले. त्यामुळे एक कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांच्या वतीने मांडलेला आवाज सभागृह ठणकावून गेला. शासनाने त्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. येत्या दोन महिन्यांत ऑटोमायझेशन निविदा जाहीर होणार असल्याने पाण्याच्या प्रश्नाला वाचा फुटली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात घेतलेल्या आक्रमक भूमिकेचे नागरिकांतून कौतुक होत असून आभारही व्यक्त केले जात आहे.*

**ॲड. आशा अरुणकुमार भगत**
**मोबाईल ८१०८३५५०००**

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**दि.चौ. अर्ज क्र. ९५०/२०२५**
**नि. ७/ड**
**ने ता १०/०९/२०२५**

१. श्रीमती. स्नेहलता जनार्दन गोवारी
वय ५६ वर्षे धंदा-घरकाम
२. सौ. सृष्टी दिपेश पाटील
वय ३१ वर्षे धंदा-घरकाम
राहणार द्वारा श्री दिपेश भगवान पाटील
१८/बी हनुमान मंदीर, तांबडशेत
पेण तालुका पनवेल जि रायगड ४०२१०७
३. कुमार साई जनार्दन गोवारी
वय ११वर्षे धंदा-शिक्षण अज्ञान पालनकर्ती
श्रीमती. स्नेहलता जनार्दन गोवारी (आई)
क्रमांक १ व ३ रा.द्वारा जनार्दन शनिवार गोवारी
घर क्रमांक २५९ कामोठे गाव
तालुका पनवेल जि रायगड ४१०२०६

सदरहु अर्जदार क. १ यांचे पती, अर्जदार क्रमांक २ व अर्जदार क्रमांक ३ यांचे वडिल कै. जनार्दन शनिवार गोवारी हे दिनांक १८/०१/२०२५ रोजी मौजे एम.जी.एम कामोठे येथे मयत झाले आहेत. कै. जनार्दन शनिवार गोवारी यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. कै. जनार्दन शनिवार गोवारी यांची आई कै सिताबाई शनिवार गोवारी या दिनांक १०/०४/२०२२ या देखिल त्यांच्या राहत्या घरी म्हणजेच कामोठे येथे मयत झालेल्या आहेत. सबब कै. जनार्दन शनिवार गोवारी यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

कै. जनार्दन शनिवार गोवारी ↓ (मयत मुळ पुरुष)
कै. सिताबाई शनिवार गोवारी ↓ (मयत मुळ पुरुषाची आई)
श्रीमती. स्नेहलता जनार्दन गोवारी ↓ (मयत मुळ पुरुषाची पत्नी)
सौ. सृष्टी जनार्दन गोवारी उर्फ
सौ. सृष्टी दिपेश पाटील ↓ (मयत मुळ पुरुषाची मुलगी)
कुमार साई जनार्दन गोवारी (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)

१. कै. जनार्दन शनिवार गोवारी यांच्या मृत्युसमयी त्यांच्या मालकीची व ताबेकब्जातील व त्यांच्या नावाची नोंद असलेल्या मिळकतींचे वर्णन येणेप्रमाणे :-

**अ) मौजे कळंबोली कॉलनी तालुका. पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंट क्र. नाव व सदनिका क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| तिरुपती कॉम्प्लेक्स को हौ सो सदनिका क्रमांक बी-७०४ | ३२ | १ई | ३६,००,०००/- |

**आ) मौजे रसायनी तालुका. पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंट क्र. नाव व सदनिका क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|
| वृंदावन फलोरा रसायनी गार्डन कॉसमॉस बिल्डींग सदनिका क्रमांक डी-९०१ सर्व्हे नंबर १५ ०-२३-००, १६/० १-००-२, १७/१अे ०३-१-२५, १७/२ ०-०७-१० चांभार्ली गाव रसायनी तालुका पनवेल जिल्हा रायगड. | २२,७७,००० /- |

**इ) मौजे कामोठे येथिल जमिन मिळकती भुसंपादीत झालेल्याचें ॲवार्ड क्रमांक / संचीका क्रमांक**

१. प्लॉट ३७ सेक्टर १२ भुखंड ३७ १३७५.०० चौ मी
संचीका क्रमांक कामोठे १६६ व १६६ सी
२. प्लॉट क्रमांक ३सी सेक्टर १७ कामोठे
३. प्लॉट क्रमांक ४९ सेक्टर १२ कामोठे
४. ॲवार्ड कमोठे/३६१ — १-६२-८
५. ॲवार्ड पनवेल / २५३ — १-३९-४
६. ॲवार्ड पनवेल/४६७ — १-३९-८
७. ॲवार्ड कमोठे/३४० सर्व्हे १५ हिस्सा ३ — ०-४७-५

ई) सदरहु कै. जनार्दन शनिवार गोवारी यांच्या मृत्युसमयी त्यांच्या मालकीची व ताबेकब्जातील असलेली टु व्हिलर प्लेझर गाडी क्रमांक MH०६-AG-५०९९ असलेली टु व्हिलर गाडी दिनांक २६/१०/२००९ रोजी घेतलेली गाडी.

कै. जनार्दन शनिवार गोवारी यांनी वरील वर्णनाची सर्व मिळकतीचे मालक आहेत. परंतु सदरची व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे व ईतर कार्यालयात चौकशी केली असता त्यांना असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका / ईतर मिळकत आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. जनार्दन शनिवार गोवारी यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर सदनिका हस्तातरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत सबब सदर अर्जास कारण घडले आहे.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**सही/-**
**क. लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

शिक्का

**सही/-**
**सह. अधीक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# कामोठ्यात विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच अनुभवली जादूच्या खेळांची मजा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी हॅट्सन कर्ड यांच्या सौजन्याने अभ्यासासोबतच जादूच्या खेळांची अद्भूत मजा अनुभवली. हा दिवस विद्यार्थ्यांसाठी अभ्यास, आनंद आणि विविध भेटवस्तूंचा अविस्मरणीय संगम ठरला.

जादूगार आणि त्यांच्या खेळांद्दल लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच नेहमीच आकर्षण असते. जादूगार आपल्या हातचलाखीने किंवा कौशल्याने प्रेक्षकांना अचंबित करतात आणि हे नेमकं कसं घडलं? असा प्रश्न विचारण्यास भाग पाडतात. असाच काहीसा अनुभव शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला. मुलांचे मनोरंजन हे प्रभूशी नाते जोडण्याचे एक द्वार आहे, हा उदात्त विचार आजच्या कार्यक्रमातून खऱ्या अर्थाने साध्य झाला. विद्यार्थ्यांना अभ्यास जितका महत्त्वाचा आहे, तितकेच त्यांचे मन आनंदी आणि उत्साही असणेही आवश्यक आहे. हीच बाब लक्षात घेऊन प्राचार्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

या वेळी पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा नाईक, ॲड. प्रतिभा भोईर, लीना पाटील, हॅट्सन कर्डच्या प्रतिनिधी वर्षा पाटील, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर, नेहा खन्ना, मिनल नाईक यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांना हॅट्सन कर्डतर्फे टिफिन आणि स्टिकर या भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.





























सामाजिक बांधिलकी, पत्रकारितेतील मूल्य जपत प्रगती करणारे वृत्तपत्र...

दैनिक राम प्रहर

१७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**महेंद्र घरत**

अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस

राष्ट्रीय कामगार नेते

---

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण, नाहीतर कायमचे आजारपण!

सर्वसामान्यांचा आवाज बुलंद करणारे वृत्तपत्र...

दैनिक राम प्रहर

१७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत कोन

(मु. कोन, पी. अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड)

सौ. अश्विनी जितेश शिसवे (सरपंच)

सौ. निकिता आदिश घरत (उपसरपंच)

श्री. अक्षय मारूती घरत (सदस्य)
श्री. दिपक धाया म्हात्रे (सदस्य)
श्री. धनराज नामदेव बडे (सदस्य)
कु. साहिल बाबुराव म्हात्रे (सदस्य)
सौ. निता नितीन म्हात्रे (सदस्या)
सौ. अंजनी अनंता पाटील (सदस्या)
सौ. ताईबाई बाळकृष्ण पाटील (सदस्या)
श्री. संजय बाळाराम जाधव (सदस्य)
सौ. सविता कैलास म्हात्रे (सदस्या)
सो. अस्मिता अमित गायकर (सदस्या)

स्वच्छता राखा...पाणी उकळून प्या...पर्यावरणाचे रक्षण करा

---

दैनिक राम प्रहर १७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

भारतीय जनता पार्टी

श्री. रामदास ठाकूर श्री. भार्गव ठाकूर

शुभेच्छुक

**मेसर्स बी. आर. ठाकूर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर**

कोपर – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. ऑफिस दूरध्वनी क्र.९९३०४०७७४६

---

दैनिक रामप्रहरच्या १७व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**IDBI BANK**

OLD PANVEL BRANCH

HOME LOAN
Power Kids Savings Account
LOAN AGAINST PROPERTY
SUPER SAVINGS A/C
AUTO LOANS
FLEXI BALANCE. FLEXI REWARDS. Flexi Current A/C
GOLD LOAN
All Other Investments Option
FD/OD LOAN
SUPER-SHAKTI WOMEN'S ACCOUNT

Add. : Mahesh Bhavan, Behind Telephone Exchange, Tapal Naka, Panvel.
Tel. : 022 - 2749 1225

---

18 जुलै

स्थानिक, प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्रांच्या लढ्याचा बुलंद आवाज म्हणून नावारूपास आलेले अग्रणी वृत्तपत्र

राम प्रहर १७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाजपा

शुभेच्छुक

**श्री. अमर म्हात्रे**

गव्हाण जि. प. विभागीय अध्यक्ष - उलवे नोड
मा. उपसरपंच ग्रामपंचायत, वहाळ - उलवे नोड

---

सामाजिक बांधिलकी, पत्रकारितेतील मूल्य जपत प्रगती करणारे वृत्तपत्र..

दैनिक राम प्रहर १७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**नितीन जयराम पाटील**

मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
पनवेल विधानसभा प्रमुख भाजपा सरचिटणीस, उत्तर रायगड जिल्हा भाजपा

---

सामाजिक बांधिलकी, पत्रकारितेतील मूल्य जपत प्रगती करणारे वृत्तपत्र...

दैनिक राम प्रहर १७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

OAK MEDICARE & DIAGNOSTICS

*WITH BEST COMPLIMENTS*

Dr. Sanjiv S. Kale
M.B.B.S | M.D (Psychiatry)
Consultant in Mental Illness & Sexologist

Dr. Aditya C. Oak
M.B.B.S | Ms (General Surgery) FMAS
Consultant Laparoscopic Surgeon

Dr. Maya S. Kale
M.B.B.S | DVD (Skin, Hair & Nail)
Consultant Dermatologist

Dr. Kavita Kale Oak
M.B.B.S | M.D (Pathology)
Consultant Pathologist

7045 525 525

Manovikas Kendra & Skin Care Clinic
134, Raje Complex, 1st floor, Above Axis Bank, Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Statue, Panvel 410206

OAK Medicare And Diagnostics
Old Kale Hospital, Ashirwad Building, Vadale Talav Road, Opp. V K High School, Panvel 410206

---

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण, नाहीतर कायमचे आजारपण!

18 जुलै

दैनिक राम प्रहर १७व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत वहाळ

(ता. पनवेल, जि. रायगड)

**रमेश नामदेव तारेकर**
(ग्रामपंचायत अधिकारी)

**मुकेश नारायण कांबळे**
(प्रशासक)

स्वच्छता राखा...पाणी उकळून प्या...पर्यावरणाचे रक्षण करा

---

दैनिक रामप्रहरच्या १७व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

# ग्रुप ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा

मु. मोहोपाडा, पो. रसायनी, ता. खालापूर, जि. रायगड

**जाहीर आवाहन**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे/मोहोपाडा हदीतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येतो की ग्रामपंचायत वासांबे हदीत ग्रामपंचायतीने प्लॅस्टीक पिशवी (कॅरिबॅग) बंद केली आहे. तरि सर्व दुकानदार व नागरिकांनी प्लॅस्टीक पिशवी (कॅरिबॅग) वापर बंद करावा. माझी वसुंधरा ६.० अभियानामध्ये वृक्ष लागवड व ई प्लेज साठी ग्रामपंचायतीस मदत करावी.

उमा संदीप मुंढे (सरपंच)
दिपक कांबळे (उपसरपंच)
वैभव बाळकृष्ण पाटील (ग्राम विकास अधिकारी)

पनवेल महानगरपालिका
स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

अभय योजना

**केवळ एक वेळची विशेष व अंतिम बाब, करदात्यांसाठी सुवर्णसंधी !!!**

# अभय योजने अंतर्गत

## मालमत्ता कर एकरकमी भरा व शास्तीवर सवलत घ्या !

१८ जुलै ते १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत
**९०%** शास्ती मध्ये सवलत.

१६ ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत
**७५%** शास्ती मध्ये सवलत.

१ ते १० सप्टेंबर २०२५ पर्यंत
**५०%** शास्ती मध्ये सवलत.

११ ते २० सप्टेंबर २०२५ पर्यंत
**२५%** शास्ती मध्ये सवलत.

चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ जुलै २०२५ पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा,
**५%** सूट हमखास मिळवा.

E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा,
**२%** सूट घेऊन बचत वाढवा!

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने,
आणि करामध्ये घ्या **२%** सूट!

जल पुनःभरणाचा अवलंब करा,
**२%** सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने
हाताळा, सवलतीचं दार उघडा
आणि करात **२%** सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट
करा, मिळवा **२%** करामध्ये
सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय
पारंपरिक रांगा सोडा,
PMC Tax App &
Panvel Connect App
वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून
कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता
करामध्ये सवलती मिळावा.

**मंगेश चितळे**
आयुक्त तथा प्रशासक,
**पनवेल महानगरपालिका**
स्वामी नित्यानंद रोड, गोखले हॉल जवळ पनवेल - 410206